# कोटेशन सुचना

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**पोस्ट: - शिर्डी - ४२३ १०९, ता.राहाता, जि. अहमदनगर**

फोन नं.-०२४२३-२५८५००, फॅक्स नं.-०२४२३-२५८८७०

website: - http://www.shrisaibabasansthan.org

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे **"श्री रामनवमी उत्सव-२०२०" करीता विद्युत रोषणाईचे साहित्य व देखाव्याचे साहित्य मुंबई येथून (वेगवेगळया ठिकाणाहून ) आणणे व पुन्हा (वेगवेगळया ठिकाणी ) पोहच करणेकामी भाडोत्री ट्रक्स** पुरविणकामी दरपत्रके मागविण्यात येत आहे.

---

**विषय :- "श्री रामनवमी उत्सव-२०२०" करीता विद्युत रोषणाईचे साहित्य व देखाव्याचे साहित्य मुंबई (वेगवेगळया ठिकाणाहून ) येथून आणणे व पुन्हा (वेगवेगळया ठिकाणी ) पोहच करणेकामी भाडोत्री ट्रक्स पुरविणेबाबत .....**

"श्री रामनवमी उत्सव-२०२०" दि.०१.०४.२०२० ते दि.०३.०४.२०२० या कालावधीत साजरा करण्यात येणार असल्याने मुंबई येथून श्री.द्वारकामाई मंडळ,मुंबई यांचे विद्युत रोषणाईचे साहित्य व देखाव्याचे साहित्य वेगवेगळ्या ठिकाणाहुन शिर्डी येथे आणणे व उत्सव संपलेनंतर पुन्हा शिर्डी येथून मुंबई येथे वेगवेगळ्या ठिकाणी पोहोच करणेकामी भाडोत्री तत्त्वावर ट्रक्स (हूड असलेल्या एल.पी.ट्रक्स ) पुरविणेकामी कोटेशन मागविण्यात येत आहे. तपशील खालीप्रमाणे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | भाडोत्री ट्रक्सची एकुण संख्या | अंदाजे मटेरियल आणणे व पोहच करणेची तारीख (वाहतुकीचा कालावधी) | ट्रक्सची संख्या | साहित्य आणणे व पोहच करणेचे मुंबईतील ठिकाण | प्रती भाडोत्री ट्रकचे (जाणे-येणे) भाडे (जी.एस.टी. करासहीत) | एकुण होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | "श्री रामनवमी उत्सव-२०२० "करीता मुंबई येथून श्री.द्वारकामाई मंडळ,मुंबई यांचे विद्युत रोषणाईचे साहित्य व देखाव्याचे साहित्य वेगवेगळ्या ठिकाणाहुन शिर्डी येथे आणणे व उत्सव संपलेनंतर पुन्हा शिर्डी येथून मुंबई येथे वेगवेगळ्या ठिकाणी पोहोच करणेकामी भाडोत्री तत्त्वावर ट्रक्स पुरविणे . ( मुंबई ते शिर्डी - १ फेरी शिर्डी ते मुंबई - २ री फेरी ) | **०६ नग मॉडेल -१६१३ - ६ टायर हूड असलेल्या एल.पी.ट्रक्स** | दि.१७ ते १९ मार्च (साहित्य आणणे) दि. १५ ते १७ एप्रिल (पोहच करणे) | **०२** | **गोरेगांव (वेस्ट)** | | |
| | | | दि.२५ ते २७ मार्च (साहित्य आणणे) दि ०४ ते ०५ एप्रिल (पोहच करणे) | **०४** | **चिंचपोकळी + लालबाग + दादर** | | |
| | **एकुण रक्कम रु (जीएसटी करासह अंतर्भुत) :-** | | | | | | |

**अटी व शर्ती** :-०१). संस्थानमार्फत कोणत्याही प्रकारचा इंधन खर्च , ड्रायव्हरचा पगार व भत्ता ,टोलकर,व इतर कर इत्यादीकरीता वरील एकुण रकमेपेक्षा वेगळी रक्कम दिली जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

०२). मटेरीअल आणण्यासाठी व पुन्हा पोहोच करण्यासाठी वरील तारखा दर्शविण्यात आलेल्या आहेत. परंतु परिस्थितीनुरुप त्यामध्ये बदल होऊ शकतो.

०३). मा.कोर्टाच्या आदेशानुसार ८ वर्षे व त्यापेक्षा जास्त कालावधी झालेल्या जड वाहनांना मुंबईत प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आली आहे व या आदेशाची अंमलबजावणी मुंबईत चालू झालेली आहे.त्यामुळे ट्रक पाठवताना पोलीस नाक्यावर अथवा मुंबईत त्रास होणार नाही या गोष्टींचा विचार करुन शक्यतो अलीकडच्या काळात पासींग झालेल्याच ट्रक पाठवाव्या लागतील यांची नोंद घ्यावी.

०४). भाडोत्री ट्रक्स पुरवितांना त्या ट्रक्सची सर्व आवश्यक ती कागदपत्रे व इन्शुरन्स बाबत जबाबदारी सर्वस्वी ट्रान्सपोर्ट मालकाची राहिल

०५). भाडोत्री ट्रक्सची संख्या कमी किंवा जास्त होऊ शकते यांची नोंद घ्यावी.

०६). भाडोत्री ट्रक्स पुरवितांना त्या ट्रकचा अपघात झाल्यास किंवा काही नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ट्रान्सपोर्ट मालकाची राहील यासाठी संस्थानमार्फत कोणती भरपाई दिली जाणार नाही.

०७). मटेरियल वाहतुक करतांना मटेरियलचे काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई करुन देणेची सर्वस्वी जबाबदारी ट्रान्सपोर्ट मालकाची राहिल. संस्थानमार्फत कोणती भरपाई दिली जाणार नाही.

०८). काम पुर्ण झालेशिवाय कोणत्याही प्रकारचा ॲडव्हान्स अगोदर दिला जाणार नाही किंवा बील अदा केले जाणार नाही , मटेरियल वाहतुकीचे काम पुर्ण झालेनंतर (मटेरियल आणणे व पोहच करणे ) बीलाची रक्कम अदा करणेत येईल.

तरी वरील सर्व अटी - शर्तीस अनुसरुन आपली कोटेशन मोहोरबंद पाकीटात , **"विद्युत विभाग "श्री रामनवमी उत्सव-२०२०" करीता विद्युत रोषणाईचे साहित्य व देखाव्याचे साहित्य मुंबई येथून (वेगवेगळया ठिकाणाहून ) आणणे व पुन्हा (वेगवेगळया ठिकाणी ) पोहच करणेकामी भाडोत्री ट्रक्स पुरविणे कामाकरीता कोटेशन "असे पाकीटावर स्पष्ट नमूद करुन,** सदर कोटेशन **दि. ११ /०३ /२०२०** रोजी सायंकाळी ५ वाजेच्या आत श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी येथील कार्यालयात त्वरीत पाठविण्याचे करावे.

श्री.अरुण डोंगरे (भा.प्र.से.)

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी